Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

## * Central Library *

CENTRAL LIBRARY
S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
YEOLA DIST. NASHIK

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 18/03/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

### News Paper Name: आपलं महानगर

**Page No. 04**

# दिनविशेष

## प्रख्यात स्त्रीवादी लेखिका मालती बेडेकर



मालती विश्राम बेडेकर या महाराष्ट्रातील एक मराठी लेखिका होत्या. मराठी साहित्यातील त्या पहिल्या प्रमुख स्त्रीवादी लेखिका होत्या. त्यांचा जन्म १८ मार्च १९०५ रोजी रायगड जिल्ह्यातील आवास येथे झाला. हिंगण्यातील महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेत त्यांचे शिक्षण झाले. तिथे त्यांच्यावर महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या पुरोगामी विचारांचा प्रभाव पडला. त्या शिक्षण संस्थेची स्थापना कर्वे यांनी केली होती. याच संस्थेतून मालतीबाईंनी महाविद्यालयीन शिक्षणही पूर्ण केले. त्यांचे माहेरचे नाव बाळूताई खरे असे होते. विश्राम बेडेकरांशी १९३८ साली त्यांचा विवाह झाला. त्या आपले लेखन विभावरी शिरूरकर ह्या नावाने प्रसिद्ध करायच्या. 'महिला सेवाग्राम'शी संबंधित असताना अनेक अनाथ, विधवा, परित्यक्तांच्या समस्या त्यांनी अनुभवल्या-अभ्यासल्या. सहृदयतेनं त्यावर मार्ग काढण्याचाही प्रयत्न केला. यातून दु:खी स्त्रीजीवनाशी त्यांचा जवळून परिचय झाला. या दु:खालाच त्यांनी कादंबरीचं रूप दिलं; मात्र हे लेखन त्यांनी मालतीबाई बेडेकर नावानं न करता 'विभावती शिरूरकर' या नावानं केलं. कारण त्या काळात स्त्रीजीवनाचं असं खरखुरं चित्रण खळबळजनक ठरलं.

अलंकारमंजूषा, हिंदू व्यवहार धर्मशास्त्र हे त्यांचे आरंभीचे ग्रंथ होते. पुढे स्त्रियांच्या जाणिवा मांडणारा 'कळ्यांचे नि:श्वास' हा त्यांचा पहिला कथासंग्रह आला. 'हिंदोळ्यावर', 'विरलेले स्वप्न', 'बळी', 'जाई', 'शबरी' या कादंबऱ्या या दृष्टीने महत्वाच्या आहेत. 'पारध', 'हिरा जो भंगला नाही', ही नाटकं, 'घराला मुकलेल्या स्त्रिया' हा समाजशास्त्रीय संशोधनात्मक लेख आणि 'स्त्रीजीवनावरील मनस्विनीचे चिंतन' हा निबंधसंग्रह एवढं त्यांचं लेखन आहे. त्यांच्या 'बळी' 'शबरी ' आणि 'घराला मुकलेल्या स्त्रिया' या पुस्तकांना राज्य शासनाची पारितोषिकं मिळाली आहेत. त्यांच्या बहुतेक कादंबऱ्यांची गुजरातीत भाषांतरे झाली आहेत. मालती बेडेकर यांचे ७ मे २००१ रोजी निधन झाले.

Nashik Edition

Mar 18, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

Jagdamba Education Society's

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401